**शेती, शेतकरी व सामान्य जनतेच्या**
**जिव्हाळ्याचे १२९ निर्णय घेतले**
**- एकनाथराव खडसे**

मुंबई, दि.१ फेब्रुवारी :- भाजपाच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनाने शेतकरी शेती, उद्योग व सर्वसामान्य माणसाला दिलासा देणारे, वर्षानुवर्षाच्या जाचातुन आणि कब्जे खटल्यातुन मुक्तता देणारे १२९ (एकशे एकोणतीस) निर्णय घेतले. या निर्णयांची मोठ्या प्रमाणात चर्चा होण्याची तसेच प्रसिध्दी माध्यमांनी त्यांना प्रसिध्दी देण्याची गरज आहे, असे महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी येथे पत्रकारांशी बोलतांना सांगितले.

खडसे पुढे म्हणाले की बेदखल तसेच आकारपड जमिनी मूळ मालकांना परत देणे, एन.ए (बिगरशेती) करण्यातील सर्व अडथळे दूर करणे, रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना संपत्तीचे हस्तांतरण करतांना मुद्रांक शुल्कातून सूट, शेत जमीन खरेदी करण्यासाठी खरेदीदार शेतकरीच असला पाहिजे ही अट दूर करणे इत्यादी निर्णयांचा यात समावेश आहे. वर्षानुवर्षेचालणारे जमिनीचे कज्जे खटले संपण्याय यामुळे मदत होणार आहे. विशेष म्हणजे असे निर्णय घ्या, अशी कोणीही मागणी केलेली नव्हती.

**-**